PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2022-23)/ 02 / of 2022**

## परिपत्रक:

**विषय:— ०६ जून दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भ:— शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, विभागाचे क्र. शिवसदि०४२१/प्र.क्र.०२/मवि—१/५४३७ दिनांक १९ मे, २०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे नव्हे तर अखिल भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या, लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजेच ६ जून, १९७४ म्हणजेच शिवराज्याभिषेक दिन होय. हा दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार दिनांक ०६ जून हा दिवस आपल्या महाविद्यालयामध्ये **"शिवस्वराज्य दिन"** म्हणून साजरा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा व अध्यापकांचा जास्तीत जास्त सहभाग राहील याची दक्षता घ्यावी. सदरचा दिन साजरा करीत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस/पुतळयास अभिवादन करणे, महाराष्ट्र गीत आणि राष्ट्रगीतांचे गायन करणे, विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित कारणे, गड किल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शने, निबंध स्पर्धा, क्रिडा स्पर्धा आणि सामाजिक संदेश देणारी शिवज्योत रॅलीचे आयोजन करावे.

शिवस्वराज्य दिन साजरा करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी हे सहभागी होतील याची दक्षता घ्यावी.

दिनांक ०६ जून रोजी झालेल्या कार्यक्रमाचे निवडक फोटो, व्हिडीओ तसेच लेख mavi.dhepune@nic.in या ईमेल वर कार्यपुर्ती अहवाल पाठविण्यात यावेत.

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांला विनंती करण्यात येते की, संदर्भाधीन परिपत्रकातील सूचनांचे पालन करण्यात यावे.

SUDHIR SHARADCHANDRA PURANIK

Digitally signed by SUDHIR SHARADCHANDRA PURANIK

(सुधीर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई—४०० ०३२
२० मे, २०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

Reg/TCD/2022-23/90


महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
ww.dhepune.gov.in E-mail- mavi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२


मांक- शिस्वदि०४२१/प्र.क्र.०२/मवि-१ / ५४३७ दिनांक- १९ मे, २०२२

19 MAY 2022

ति,

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
२. कुलसचिव, सर्व अभिमत विद्यापीठे
३. कुलसचिव सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
४. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
५. संचालक, कला संचालनालय, मुंबई
६. संचालक, ग्रंथालय,मुंबई
७. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
८. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण

विषय **'६जून' हा दिवस राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये " शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्याबाबत**

संदर्भ १.शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३०/विशि-५ दिनांक ३ जून, २०२१

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या, लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्वाचा दिवस म्हणजेच **६ जून,१६७४ म्हणजेच शिवराज्याभिषेक** दिन होय. हा दिवस **शिवस्वराज्य दिन** म्हणून साजरा करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

DR-CAO

त्यानुसार दिनांक ०६ जून हा दिवस आपल्या विद्यापीठामध्ये तसेच संलग्नित सर्व महाविद्यालयामध्ये 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. तसेच या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा व अध्यापकांचा जास्तीत जास्त सहभाग राहील याची दक्षता घ्यावी. सदरचा दिन साजरा करीत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस/पुतळयास अभिवादन करणे, महाराष्ट्र गीत आणि राष्ट्रगीताचे गायन करणे, विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करणे, गड किल्ल्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शने, निबंध स्पर्धा, क्रिडा स्पर्धा आणि सामाजिक संदेश देणारी शिवज्योत रॅलीचे आयोजन करावे.

'शिवस्वराज्य दिन' साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी हे सहभागी होतील याची दक्षता घ्यावी. तसे कुलसचिव सर्व विद्यापीठे व विद्यापीठांनी तसेच विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी आपल्या स्तरावरुन सर्व महाविद्यालयांना याबाबत तात्काळ अवगत करावे.

दिनांक ०६ जून रोजी झालेल्या कार्यक्रमाचे निवडक फोटो, व्हिडीओ तसेच लेख या संचालनालयास mavi.dhepune@nic.in या ईमेल वर कार्यपुर्ती अहवालासह संचालक, कला/ग्रंथालय, कुलसचिव सर्व विद्यापीठे व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी एकत्रित करुन आठ दिवसात पाठवावेत.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२